<u>ॲड. श्री. अशोक मुंदरगी, विशेष सरकारी अभियोक्ता यांना व्यावसायिक फी मंजूर करण्याबाबत.</u>

राजारामपुरी पोलीस ठाणे, येथील गु.र.नं. ३९/२०१५ (गोविंद पानसरे हत्या प्रकरण) या गुन्हयाच्या संदर्भात मा.मुंबई उच्च न्यायालयामध्ये दाखल रिट पिटिशन क्र.१५६५/ २०१५ व २००५ /२०१६ या प्रकरणामधील कामकाजासाठी

महाराष्ट्र शासन
गृह विभाग
शासन निर्णय क्रमांकः एसपीपी ०११६/प्र.क्र.२५/पोल-१०

गृह विभाग, २ रा मजला, मंत्रालय,
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा रोड,
मुंबई-४०० ०३२
दिनांक :१९ जून, २०१९

<u>संदर्भ :</u> शासन पत्र, विधी व न्याय विभाग क्र. ४६/१६/क्रिमि.जन./१६/"अ" शाखा,
दिनांक १४ डिसेंबर, २०१६

शासन निर्णय:-

राजारामपुरी पोलीस ठाणे, कोल्हापूर येथे गु.र.नं. ३९/२०१५ (गोविंद पानसरे हत्या प्रकरण) या गुन्हयासंदर्भात मा.उच्च न्यायालय, मुंबई येथे दाखल रिट याचिका क्र.१५६५/२०१५ व २००५/२०१६ या प्रकरणी शासनाची बाजू मांडण्यासाठी ज्येष्ठ विधिज्ञ ॲड. श्री. अशोक मुंदरगी यांची विधि व न्याय विभागाने उपरोक्त नमूद दि.१४/१२/२०१६ च्या पत्रान्वये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणुन नियुक्ती केली आहे. सबब, प्रस्तुत प्रकरणी ॲड.श्री. अशोक मुंदरगी, विशेष सरकारी अभियोक्ता यांना खालीलप्रमाणे फी अदा करण्यास या शासन निर्णयान्वये मान्यता देण्यात येत आहे.

अ) प्रतिदिन परिणामकारक सुनावणी फी-------- रू.७५,०००/-

२. परिणामकारक सुनावणीचे दिवस संबंधीत प्रकरणाच्या पर्यवेक्षीय पोलीस उपायुक्त दर्जाहून कमी नाही, अशा अधिका-याकडून प्रमाणित करुन घेण्यात यावेत व कोणत्याही प्रकारचे अतिरिक्त प्रदान होणार नाही, याची दक्षता घ्यावी. तसेच, प्रस्तुत प्रकरणी ॲड.श्री.अशोक मुंदरगी, विशेष सरकारी अभियोक्ता यांना उपरोक्त फी व्यतिरिक्त अपरिणामकारक सुनावणी फी किंवा अन्य कोणत्याही प्रकारची फी वा भत्ता अनुज्ञेय असणार नाही.

३. यासाठी येणारा खर्च या विभागाच्या मागणी क्र.बी-१, २०५५ पोलीस - (००) १०९, जिल्हा पोलीस (००) (०१) जिल्हा पोलीस दल - (२०५५ ०१६८) - २८ व्यावसायिक सेवा या लेखाशीर्षाखालील त्या त्या आर्थिक वर्षाच्या मंजूर अनुदानातून व मासिक निधी विवरणपत्रानुसार भागविण्यात येईल.

४. हा शासन निर्णय वित्त विभागाच्या शासन निर्णय क्र.विअप-२०१५/ प्र.क्र.२१/ २०१५/विनियम, २९ जुलै, २०१५ अन्वये, वित्तिय अधिकार नियमपुस्तिका १९७८, भाग-पहिला, उपविभाग दोन मध्ये नव्याने समावेश केलेल्या अ.क्र.४९ नियम क्र.१६६-"अ" नुसार प्रशासनिक विभागांना प्रदान केलेल्या अधिकारानुसार विधि व न्याय विभागाच्या सहमतीने निर्गमित करण्यात येत आहे.

५. सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१९०६१९१७५०३४६९२९ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Kishor Shyamrao Bhalerao

Digitally signed by Kishor Shyamrao Bhalerao
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Home Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=ce6f6edd7e1dfc6b4d6b65b7d93aa1a1dbcf0ec79c7c2143850ff6e8fdcb4c0d, serialNumber=94524ab889e2fa9e6bfe5e1e58426881bc36b968ffd0f45ce2d4bd3ff527ded2, cn=Kishor Shyamrao Bhalerao
Date: 2019.06.19 17:49:39 +05'30'

(किशोर भालेराव)

उप सचिव (विधी),गृह विभाग, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
२. पोलीस आयुक्त, बृहन्मुबई.
३. पोलीस अधीक्षक, कोल्हापूर
४. महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता/लेखा परीक्षा) -१/२,महाराष्ट्र राज्य, मुंबई/नागपूर
५. अधिदान व लेखाधिकारी, मुंबई.
६. निवासी लेखापरीक्षा अधिकारी, मुंबई.
७. विधी व न्याय विभाग (का १४), मंत्रालय, मुंबई.
८. वित्त विभाग (व्यय- ७), मंत्रालय, मुंबई.
९. ॲड.श्री.अशोक मुंदरगी, विशेष सरकारी अभियोक्ता (पोलीस महासंचालक, महाराष्ट्र राज्य, मुंबई यांच्या मार्फत.)
१०. निवड नस्ती (पोल-१०).